



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक २१२ वा. ✻ मंगळवार दि.२४ फेब्रुवारी २०२६ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 212 ✻ Tuesday 24 Febuary 2026 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


## श्री घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग दर्जा प्रदान

### ना.शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला यश; ग्रामस्थांमधून समाधान

सातारा- राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून कास पठार परिसरातील घाटवण ता. सातारा येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. याबद्दल घाटाईदेवी देवस्थान ट्रस्ट, परिसरातील ग्रामस्थ आणि भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



घाटवण येथील घाटाईदेवीच्या यात्रेला दरवर्षी हजारो भक्त- भाविक येत असतात. यापूर्वी 'क' वर्ग असल्याने या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मर्यादा येत होत्या.

या तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळावा अशी मागणी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्याकडे केली होती. घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळावा यासाठी ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला.

त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने राज्याच्या ग्रामविकास विभागाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेतून घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा प्रदान केल्याचा निर्णय जाहीर केला आहे.

घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळाल्याने या तीर्थक्षेत्र परिसरातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी, भाविकांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भरीव निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे घाटाईदेवी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार मानले आहेत.

## कृष्णा कारखान्याच्यावतीने ऊस तोडणी कामगारांना आयुष्मान कार्डचे वितरण


शिवनगर : रेठरे बु. येथील य.मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने स्थलांतरित ऊस तोडणी कामगारांसाठी आयुष्मान भारत कार्डचे वितरण कारखान्याचे व्हाईस चेअरमन जगदीश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

यावेळी संचालक बाबासो शिंदे, जिल्हा परिषद सदस्या सौ. प्रियांका साळुंखे, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. राजकुमार पवार, मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार, जनरल मॅनेजर केन दादासाहेब शेळके, पर्यावरण अधिकारी सुयोग खानविलकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल निकम, कृष्णा सहकारी बँकेचे माजी संचालक तातोबा थोरात,




शिक्षिका राधिका लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. व्हाईस चेअरमन जगदीश जगताप म्हणाले, चेअरमन डॉ.सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याशी संबंधित पात्र स्थलांतरित कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मोफत व कॅशलेस आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार म्हणाले, साखर उद्योगात मोलाचे योगदान देणाऱ्या कष्टकरी कुटुंबांना आरोग्य सुरक्षा व आवश्यक सहाय्य प्रदान करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. मान्यवरांच्या हस्ते ऊस तोडणी कामगारांना आयुष्मान भारत कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी साखर शाळेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## कॉ.अंजलीताई महाबळेश्वरकर



सातारा नगरपालिकेच्या माजी नगरसेविका आणि डाव्या चळवळीतील ज्येष्ठ नेत्या कॉ. अंजलीताई प्रभाकर महाबळेश्वरकर (वय ८९) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने साताऱ्यातील डाव्या विचारसरणीचा लढवय्या आणि तत्त्वनिष्ठ आवाज हरपला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. प्रभाकर महाबळेश्वरकर यांच्या पत्नी होत.

सातारा नगरपरिषदेच्या राजकारणात अंजलीताई यांनी विरोधी पक्षनेत्या म्हणून निडर भूमिका बजावली. सभागृहात सत्ताधाऱ्यांना जाब विचारताना त्यांची मांडणी नेमकी, अभ्यासपूर्ण आणि तडजोड न करणारी असे. आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणे आणि लोकहिताच्या प्रश्नांवर कोणतीही भीड न बाळगता आवाज उठवणे, ही त्यांची ओळख होती. नगरपरिषदेतील त्यांचा कार्यकाळ हा केवळ पदाचा नव्हता, तर जनतेच्या प्रश्नांसाठी लढण्याचा काळ म्हणून ओळखला जातो.

महाबळेश्वरकर दांपत्यांनी साताऱ्यातील प्रस्थापित राजकारणाला थेट आव्हान दिले. शहरातील पाणीपुरवठा, नागरी सुविधा, झोपडपट्ट्यांचे प्रश्न, कामगारांचे हक्क आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. चौकाचौकांत पुठ्यांवर प्रश्न लिहून फलक लावून प्रशासनाचे लक्ष वेधण्याची त्यांची आगळी पद्धत त्या काळात विशेष चर्चेचा विषय ठरली होती.

साताऱ्यातील मंगळवार पेठेतील दुमजली कौलारू घर हे कम्युनिस्ट पक्ष आणि कामगार-कष्टकरी चळवळीचे केंद्र म्हणून ओळखले जात होते. येथे विविध बैठका, शिबिरे आणि मोर्चांचे नियोजन होत असे. अनेक राष्ट्रीय स्तरावरील डावे नेते-कार्यकर्ते येथे येत असत. जागतिक कामगार दिनाच्या मोर्चात सहभागी होणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांची व्यवस्था अंजलीताईंनी साध्या पण आत्मीयतेने केलेल्या जेवणातून केली होती.

महाबळेश्वरकर दांपत्याने सुमारे पाच दशके सातारा जिल्ह्यातील कामगार-कष्टकरी आणि पुरोगामी चळवळीचे नेतृत्व करताना मोठा त्याग केला. नगरसेवक पदाव्यतिरिक्त इतर कोणतेही पद न मिळूनही पद हे त्यांच्यासाठी गौण राहिले. काही वर्षांपूर्वी प्रभाकर महाबळेश्वरकर यांचे निधन झाल्यानंतरही अंजलीताईंनी चळवळीतील कार्य सुरू ठेवले. आपल्या संयुक्त बचत खात्यातील उरलेली रक्कम पक्षाला देणगी म्हणून देत त्यांनी सामाजिक बांधिलकीची जपणूक केली. डाव्या चळवळीतील अनेक ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या निधनानंतर आता अंजलीताई यांच्या जाण्याने चळवळीत न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

- **गोरख तावरे,** कराड -
मो.९३२६७११७२१

## राज्यपालांचे संत गाडगे बाबा यांना अभिवादन

**संत गाडगे बाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज सोमवार (दि. २३) लोक भवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सह सचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ निशिकांत देशपांडे, राज्यपालांचे परिसहायक अभयसिंह देशमुख, राज्यपालांचे परिसहायक ले. विक्रम कुमार तसेच लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी व लोकभवन येथे कर्तव्यावर असलेल्या पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांनी संत गाडगे बाबा यांना अभिवादन केले.**



## उपमुख्यमंत्री गावी शेतीत रमल्याने शेतकरी संघटनेला हात हलवत परतावे लागले

(अजित जगताप)

तापोळा दि: महाराष्ट्र राज्याचे शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती आहेत. महाबळेश्वर तालुक्यातील दरे तांब या गावी ते खाजगी दौऱ्यानिमित्त अमावस्या च्या दोन दिवसानंतर येतात . मुख्यमंत्री गावाला भेटीला आल्याचे समजतात अनेक जण धाव घेतात. पण, अमावस्या नंतर दोन दिवसांनी आलेल्या उपमुख्यमंत्री शेतात रमल्यामुळे शेतकरी संघटनेच्या महत्वाच्या प्रश्नाबाबत चर्चा करणाऱ्या कार्यकर्त्यांना भेट न घेता हात हलवत परतावे लागल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याची आता चर्चा चांगलीच जोर धरू लागलेली आहे.दरम्यान , दरेतांब गावात उपमुख्यमंत्र्यांच्या निकटवर्ती यांनी शेतकरी संघटनेची भेट घेऊन त्यांचे निवेदन स्वीकारले आहे. त्यांना दिलासा दिला आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेने प्रसारमाध्यमाशी बोलताना दिली.





याबाबत माहिती अशी की, राज्याचे मुख्यमंत्रीपद प्राप्त झाल्यानंतर महाबळेश्वर तालुक्यातील दरे तांब हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गाव चांगलेच प्रकाश झोतात आले होते .त्यांच्या प्रतिमेचा फायदा घेण्यासाठी अनेकजण धाव घेत आहेत. शासकीय पातळीवर प्रोटोकॉल असल्यामुळे अधिकारी वर्गांना हजर राहणे क्रमप्राप्त असले तरी काही माध्यमांनी तर मुख्यमंत्र्यांची शेती हाच विषय चांगलाच लावून धरला. देशी- विदेशी वाण पाहण्यात त्यांनी धन्यता मानली. पण, सातारा जिल्ह्यातून आलेल्या शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी निवेदन घेऊन येणाऱ्या अनेकांना मात्र भेट नाकारली गेली आहे. त्यामुळे ही बाजू सुद्धा माध्यमांनी प्रकाशित केली आहे. शनिवारी दिनांक २१ फेब्रुवारी रोजी दुपारी शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन दरे तांब गाव गाठले होते .मोठ्या आशेने लाँच व नंतर पायपीट करून उपमुख्यमंत्र्यांचा बंगला गाठला. पण, त्या ठिकाणी अगोदरच ठिय्या देऊन बसलेल्या टोळक्यांमुळे त्यांच्या भेटता आले नाही. अखेर नवनिर्वाचित शिवसेनेचे सदस्य व उपमुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय संजय मोरे यांनी शेतकरी संघटनेचे निवेदन घेऊन ते उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याचा शब्द दिला. शिवसेनेमध्ये प्रवेश केलेल्या काही कार्यकर्त्यांनी सुद्धा आपल्या व्यक्तिगत प्रश्नांसाठी दरे तांब गावी आले होते. त्यांची ही भेट झाली नाही. दरे तांब गावात उपमुख्यमंत्र्यांच्या खाजगी दौऱ्यात पूर्वीसारखी गर्दी होत नाही. ही वस्तुस्थिती असूनही लोक मोठ्या आशेने निवेदन घेऊन येतात. पण, त्यांची भेट होत नाही. याबाबत आता धोरणात्मक निर्णय उपमुख्यमंत्र्यांनीच घ्यावा. अशी मागणी पुढे आलेली आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा खाजगी दौरा असला तरी शासकीय यंत्रणा कार्यरत असते. त्यामुळे सामान्य माणसांना प्रश्न मांडण्याचा अधिकार आहे. सामान्य माणसं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कशी खेती करतात? हे बघायला येत नसून आपले प्रश्न घेऊन येतात. हे आता कुणीतरी ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. सामान्य माणसांना दिलासा देणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उत्तम शेती करतात. त्याबद्दल त्यांचे आभारी आहे .परंतु ,शेतकऱ्यांचे प्रश्न स्ट्रॉबेरी इतकेच त्यांनी महत्वाचे मानून बघावे.अशी मागणी शेतकरी संघटनेचे धन्यकुमार जाधव, विजय पाटील, नवनाथ कदम व माण , फलटण, कोरेगाव, कराड,खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## मलकापुरात बेकायदेशीर देशी दारू विक्रीविरोधात उत्पादन शुल्कची कारवाई

### भीमशक्ती सामाजिक संस्थेच्या निवेदनाची दखल; पंचनामा करून पुढील कारवाई सुरू

कराड (प्रतिनिधी): मलकापूर (ता. कराड) येथील क्वालिटी लिकर्स सीएल-३ क्र. १२ या अनुज्ञप्तीधारक दुकानात देशी दारूची बेकायदेशीर होलसेल विक्री सुरू असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकून कारवाई केली. सीसीटीव्ही फुटेज तपासणीत संशयास्पद हालचाली आढळून आल्याने संबंधितांवर विभागीय कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक बापूसाहेब डोणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी १.१० वाजता पथकाने दुकानात प्रवेश करून सखोल तपासणी केली. यावेळी पंच म्हणून आनंदराव लादे (रा. बुधवार पेठ, कराड) व रामकुमार ब्रोट (रा. वारुंजी, ता. कराड) उपस्थित होते. उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने सकाळी ८.५५ ते दुपारी १.०६ या वेळेतील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता वारंवार २ ते ३ दुचाकींवर (काळ्या व पांढऱ्या रंगाच्या, विना क्रमांक प्लेट) देशी दारूचे बॉक्स पांढऱ्या पोत्यात भरून बाहेर नेण्यात येत असल्याचे दिसून आले. तसेच लाल रंगाची मारुती व्हॅन व पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून बॉक्स भरून त्यावर काळे कापड टाकून वाहतूक करण्यात येत असल्याचे आढळले. या प्रकारावरून देशी दारूची होलसेल विक्री झाल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, बेकायदेशीर दारू विक्रीप्रकरणी भीमशक्ती सामाजिक संस्थेचे जिल्हाध्यक्ष आनंदराव लादे यांनी निरीक्षक बी. एस. डोणे यांना निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी केली होती.

त्यांच्या निवेदनाची दखल घेत उत्पादन शुल्क विभागाने ही धडक कारवाई केली. कारवाईदरम्यान उपस्थित अनुज्ञप्ती प्रतिनिधी आयुष सुनिल बसंतानी यांना नियमभंगाची जाणीव करून देण्यात आली. विभागीय गुन्हा नोंदविण्याबाबत नमुना व आरोपपत्राची प्रत जागीच देण्यात आली असून, त्यांचा जबाबही नोंदविण्यात आला आहे. सदर पंचनामा दुपारी १ वाजता सुरू करून ३ वाजता घटनास्थळी पूर्ण करण्यात आला. पंचांनी पाहिलेल्या परिस्थितीनुसार पंचनामा तयार करून त्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, बेकायदेशीर होलसेल विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## शिराळ्यात २८ फेब्रुवारीला 'शिराळा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव २०२६'

शिराळा : शिराळा येथे शनिवारी (ता. २८) फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत रेड येथील श्री शिवाजीराव देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे 'शिराळा आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव २०२६' आयोजित करण्यात आला असल्याची माहिती महोत्सवाचे दिग्दर्शक, आयोजक व अभिनेते रंगराव घागरे यांनी शिराळा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.यावेळी घागरे म्हणाले की, आर. जी. ७ स्टुडिओज प्रस्तुत व शिराळा सांस्कृतिक कला मंच यांच्या सहकार्याने हा लघुपट महोत्सव व पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. लघुपट प्रेमी, निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि रसिक प्रेक्षकांसाठी हा महोत्सव रंगतदार आणि संस्मरणीय ठरणार आहे. या महोत्सवाला चित्रपटसृष्टी व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ चे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, आमदार सत्यजीत देशमुख, माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक, माजी आमदार मानसिंगराव नाईक, भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, मनसे जिल्हाध्यक्ष तानाजीराव सावंत, नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक, तहसीलदार शामला खोत-पाटील, पोलीस निरीक्षक जंबाजी भोसले, प्रसिद्ध दिग्दर्शक राज मोहिते, निर्माते सुनील भोसले, राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक शेखर रणस्वांबे, माजी जिल्हा परिषद सदस्य के. डी. पाटील, माजी पंचायत समिती सदस्य अमर पाटील, शिवसाई ग्रुपचे संस्थापक-अध्यक्ष कृष्णा पाटील, महाराष्ट्र बांधकाम उद्योग सेनेचे अध्यक्ष ॲड. प्रशांत अनगुडे तसेच निर्माता-उद्योजक अरविंद घेवडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



## संपादकीय....

# मुळ प्रश्नांवर चर्चा होणे..!

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीची संयुक्त बैठक शिवालय येथे पार पडली. या बैठकीनंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत भास्कर जाधव म्हणाले, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीचे अंग आहे मात्र प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सरकार मस्तीत आहे त्यामुळे ते विरोधकांचा सन्मान राखत नाहीत. सत्ताधा–यांचे वर्तन लोकशाहीला, संविधानाला धरून नाही म्हणून आम्ही या चहापानावर बहिष्कार टाकत आहोत. जिथे मान–सन्मान नाही तिथे आम्ही जाणार नाही. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) पक्षाचा एकही नेता उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात ड्रग्जचा वापर इतका वाढला आहे की, महाराष्ट्र आता 'उडता पंजाब' होतोय की काय अशी भीती वाटत आहे. अजित पवार यांच्या अपघाताबाबत सरकारने ठेवलेली संदिग्धता आणि अदानींच्या डिजिटल मीटरबाबत मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका यावरही त्यांनी कडाडून टीका केली.


जनतेवर सक्तीने मीटर लादणे आणि वरून 'एक नंबरचे राज्य' म्हणून छाती बडवणे हे ढोंग आहे, असा टोला जाधव यांनी लगावला. शेतकरी प्रश्न आणि महिला कल्याण योजनांवरूनही विरोधकांनी सरकारला घेरण्याची तयारी दर्शवली आहे. राज्यात शेतकरी आत्महत्यांच्या घटना वाढत असताना कर्जमाफीबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याची टीका करण्यात आली. 'लाडकी बहीण' योजनेचे हप्ते मागील २ महिन्यांपासून न मिळाल्याने महिला लाभार्थ्यांमध्ये असंतोष असल्याचा मुद्दा विरोधकांनी उपस्थित केला. महाविकास आघाडीच्या बैठकीत अधिवेशनातील रणनिती ठरवण्यात आली. विविध विषयांवर सरकारला कोंडीत पकडण्यासाठी समन्वय साधण्याचा निर्णय घेण्यात आला. विरोधकांचा आरोप आहे की, सत्ताधारी पक्ष चर्चेला टाळाटाळ करत असून विधिमंडळाच्या परंपरांचा आदर राखला जात नाही. चहापानावर बहिष्कार हा औपचारिक कार्यक्रमाचा भाग असला तरी त्या मागे असलेली राजकीय भूमिका अधिक महत्त्वाची आहे. विधिमंडळातील संवादाचा पूल तुटत चालल्याचे संकेत यातून मिळत आहेत.

आगामी अर्थसंकल्पात महसूल तूट, विकास प्रकल्प, सामाजिक योजना आणि शेतकरी कल्याण या विषयांवर तीव्र चर्चा अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तणाव वाढल्यास कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा बहिष्कार म्हणजे सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न असला तरी त्यातून अधिवेशनातील संघर्ष अधिक तीव्र होणार आहे. लोकशाही प्रक्रियेत संवाद महत्त्वाचा असतो मात्र सध्या आरोप–प्रत्यारोपांच्या राजकारणात संवादाचा सूर हरवत चालल्याचे चित्र दिसत आहे. आगामी काही दिवसांत अधिवेशनात कोणते मुद्दे गाजतात आणि सरकार त्याला कशा प्रकारे उत्तरे देते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# स्वाभिमान व समता शिवरायांच्या स्वराज्याचे सूत्र-कैलाश देसाई

इस्लामपूर : बंधुता, स्वाभिमान व समता हेच शिवरायांच्या स्वराज्य पायाभरणीचे सूत्र होते. शिवरायांनी घालून दिलेली स्वराज्याची आदर्श नैतिक मूल्ये आजच्या राज्यकर्त्यांनी स्वीकारावीत. असे प्रतिपादन शिवशंभु प्रतिष्ठानचे राज्य समन्वयक कैलाश देसाई यांनी केले. ते येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागामार्फत आयोजित केलेल्या 'छत्रपती शिवाजी राजांचे सांस्कृतिक धोरण व आजची दशा' या विषयावरील व्याख्यानामध्ये बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अंकुश बेलवटकर होते. कैलाश देसाई पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज मुत्सद्दी, लोककल्याणकारी आणि नीतिमान राजे होते.

शिवरायांनी आपल्या राज्यात कधीही भेदभाव केला नाही. आपल्या राजकीय विरोधकांच्या आईचा, पत्नीचा, मुलांचा, बहिणींचा आदर, सन्मान आणि संरक्षण करण्याचे शिवरायांचे धोरण होते. परंतु आजचे राज्यकर्ते अगदी खालच्या पातळीवर येऊन विरोधकांच्या कुटुंबीयांवर टीका करतात. जाती–जाती धर्मा–धर्मात द्वेष पसरवण्याचे काम करतात. वतनदारी व जहागीरदारी व्यवस्था








शिवरायांनी संपविली. परंतु आजचे राज्यकर्ते नवसरंजामदार बनले आहेत. आजची राज्यव्यवस्था शिवरायांच्या स्वराज्याच्या विचाराला व लोकशाहीला घातक आहे. राजकारण करणाऱ्यांनी शिवरायांच्या नावे मतांचा जोगवा मागू नये. सर्व जाती धर्मीयांचा मानसन्मान ठेवावा. शिवरायांचे स्वराज्य म्हणजे आधुनिक लोकशाहीचा पायाच होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिवरायांच्या स्वराज्याचे संविधानात रूपांतर केले. शिवरायांचा ध्वज गेरू व मातीच्या रंगाचा आहे तो ध्वज वारकरी आहे. वारकरी परंपरेचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा. अध्यक्ष डॉ. बेलवटकर म्हणाले. पर्यावरण रक्षण, शेती सुधारणा व लोककल्याणकारी कामे शिवाजी राजांनी घडवून आणली. त्यांच्या आज्ञापत्रातून स्वराज्याची आदर्श मूल्ये दिसून येतात. स्वराज्याला नैतिक अधिष्ठान शिवरायांनी मिळवून दिले. त्यांनी कधीच आत्यंतिक धर्मवाद जोपासला नाही. कर्मकांड व अंधश्रद्धा विरोध केला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. राम घुले यांनी केले. या निमित्ताने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कल्याणी साळुंखे, द्वितीय क्रमांक अक्षय पाटील व तृतीय क्रमांक तृप्ती गोंधळी यांना प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षक प्रा. संध्या साठे व प्रा. स्वाती चौधरी होते. बीए भाग एकच्या विद्यार्थ्यांनी शिवबाचा पाळणा व पोवाडा सादर केला.छत्रपती शिवाजी राजे व स्वराज्याची राजचिन्हे या विषयावर रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये प्रथम क्रमांक आरती चव्हाण, द्वितीय क्रमांक श्रावणी पाटील व तृतीय क्रमांक करुणा काळे यांना प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. शैलजा पाटील व प्रा. उत्तरा पाटील यांनी केले. प्रथम तीन क्रमांकांना ट्रॉफी, प्रमाणपत्रे व रोख रक्कम देण्यात आली. विद्यार्थिनींनी शिवकालीन वेशभूषा परिधान केली. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. सूत्रसंचालन करुणा काळे यांनी केले. प्रा. के. बी. पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवपदयात्रा इस्लामपूर शहरात काढण्यात आली. प्रा वर्षा पाटील यांनी पदयात्रेचे संयोजन केले. महाविद्यालयाचा शिक्षक वर्ग व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

### 'हिंद दी चादर' कार्यक्रमानिमित्त २३ फेब्रुवारी रोजी सामूहिक गीत गायन;जागतिक विक्रमाची होणार नोंद

# कोकण विभागातील सुमारे २० हजार शैक्षणिक संस्था, ५१ लाख विद्यार्थी आणि १.५ लाख शिक्षक व कर्मचारी एकाच वेळी होणार सहभागी-कोकण विभागीय आयुक्त डॉ.सूर्यवंशी

नवी मुंबई – 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त कोकण विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता सामूहिक गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या ऐतिहासिक उपक्रमात कोकण विभागातील सुमारे २० हजार शैक्षणिक संस्था, ५१ लाख विद्यार्थी आणि १.५ लाख शिक्षक व कर्मचारी एकाच वेळी सहभागी होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कोकण विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना केले आहे.

**जागतिक विक्रमाची नोंद**

या विशेष उपक्रमाची दखल 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' या संस्थेकडून घेतली जाणार आहे. 'हिंद दी चादर' श्री गुरू तेग बहादूरजींच्या स्मृतीनिमित्त २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २९ मधील ओवे मैदानात मुख्य 'शहीदी समागम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी गुरुजींच्या जीवनावर आधारित एक प्रेरणादायी गीत गायले असून, हेच गीत २३ फेब्रुवारी रोजी कोकण विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांमधून सकाळी ९ वाजता गायले जाणार आहे.

**स्पर्धा परीक्षेचे आयोजन...**

सामूहिक गायनानंतर, श्री गुरू तेग बहादूरजींच्या जीवनकार्यावर आधारित एक ऐच्छिक स्पर्धा परीक्षा देखील आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन गुरुजींच्या बलिदानाची आणि शौर्याची माहिती घ्यावी, असे आवाहन डॉ. सूर्यवंशी यांनी केले आहे. विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांना या उपक्रमाचे नियोजन प्रभावीपणे करण्याचे निर्देश दिले आहेत.

या उपक्रमातून नवीन पिढीला राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण मिळेल. कोकण विभागातील प्रत्येक विद्यार्थ्याने आणि नागरिकाने या राष्ट्रभक्तीच्या कार्यात सहभागी व्हावे. असे आवाहनही डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांमधून संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून सोशल मीडियाद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

# कृषी विभागाच्या पौष्टिक तृणधान्य महोत्सवामध्ये २५ लाखाची उलाढाल

सातारा – नागरिकांनी दैनंदिन आहारात पौष्टिक तृणधान्यांचा समावेश करावा, आरोग्यदायी कृषी उत्पादने थेट शेतक–याकडून ग्राहकांना खरेदी करता यावी व ताजे व स्वच्छ अन्नधान्य, व दर्जेदार फळाच्या खरेदीचा लाभ घेता यावा यासाठी कृषी विभागाच्या अधीक्षक कृषि कार्यालयामार्फत सातारा येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात दि २० व २१ फेब्रुवारी कालावधीत पौष्टिक तृणधान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळून २५ लाखांची उलाढाल झाली .

या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या हस्ते झाले. यावेळी मान्यवरांनी महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या शेतकरी गटांच्या विविध उत्पादनांच्या स्टॉलना भेट दिली व विविध वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले. पौष्टिक तृणधान्ये व त्यांचे आहारातील महत्व लक्षात घेऊन जास्तीत जास्त ग्राहकांनी या महोत्सवात आरोग्यदायी कृषी माल खरेदी केला. महोत्सवामध्ये ज्वारी च्या विविध वाणाचे धान्य त्यामध्ये मालदांडी, सुपर मोती, परभणी मोती, फुले रेवती व फुले सूचित्रा परळी बोन्यातील देशी नाचणी, तांदूळ, जावळीची नाचणी, माण व खटावची बाजरी, ज्वारी विक्रीसाठी उपलब्ध होते. कडधान्यामध्ये जात्यावर दळलेली मूग, उडीद, काळ्या घेवाड्याची डाळ तसेच हिरवा मूग, हुलगे त्याचबरोबर महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे सातारा जिल्ह्यात उत्पादित झालेली व उच्च करकुमिन असलेली वाईची सेंद्रिय हळद, साकडी पाण्यावरील तेल, तसंच मिलेटचे विविध पदार्थ त्यामध्ये विविध प्रकारच्या, नाचणीच्या शेवया, नाचणीचे इडली पीठ, उडीद लाडू, नाचणी अंबिल, पापड, नाचणी सत्व, नाचणी रवा तसेच पौष्टिक तृणधान्यांपासून तयार केलेले प्रक्रिया पदार्थ आदी वैशिष्ट्यपूर्ण व दर्जेदार उत्पादने शेतकरी गट, महिला बचत गट यांच्या माध्यमातून विक्रमी विक्री झाली.

या महोत्सवामध्ये कृषी माल व पौष्टिक तृणधान्य प्रक्रियायुक्त पदार्थ विक्रीसाठी ५५ स्टॉल्स उभारण्यात आलेले होते. कोरेगावचा जीआय मानांकन प्राप्त वाघ्या घेवडा, खंडाळा येथील देशी बाजरी, कऱ्हाडची नाचणी, जावळी, पाटणचा देशी इंद्रायणी तांदूळ, फळांचे गाव धुमाळवाडी येथील डाळिंब, पेरू, चिक्कू, अंजीर, द्राक्षे, रामफळ, बोर, चिंच, पपई व महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी अशा दर्जेदार फळांची सातारा शहरातील ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली.

महोत्सवाच्या माध्यमातून कृषिमाल खरेदी व विक्री साठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शेतकरी व ग्राहकांनी समाधान व्यक्त केले. अशा प्रकारचे कृषी माल विक्री महोत्सव प्रत्येक महिन्यात घ्यावा अशी मागणीही शेतकरी गटांनी केल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक भाग्यश्री फरांदे यांनी कळविले आहे.

# 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता' व 'महा आवास अभियान–ग्रामीण' अंतर्गत विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

नवी मुंबई : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान (सन २०१८–१९ ते २०२२–२३) अंतर्गत स्पर्धेत निवड झालेल्या ग्रामपंचायतींचा विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता सिडको भवन कार्यालय सभागृह, सातवा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात येते. ग्रामपंचायतींनी राबविलेल्या विविध स्वच्छता उपक्रमांचे मूल्यमापन करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून, त्यांना या सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे.

यासोबतच 'महा आवास अभियान–ग्रामीण' अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींनाही गौरविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी, लाभार्थ्यांना दिलासा आणि पारदर्शक कार्यपद्धती या निकषांवर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

हा पुरस्कार वितरण सोहळा कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या शुभहस्ते पार पडणार असून, कार्यक्रमास विविध जिल्ह्यांतील अधिकारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण विकास, स्वच्छता आणि गृहनिर्माण या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करून शासनाच्या योजनांना अधिक गती देण्याचा या कार्यक्रमामागील उद्देश आहे.

# पुन्हा अवकाळी

लातूर/धाराशिव : लातूरसह नांदेड, छ. संभाजीनगर, परभणी, बीड, धाराशिव, हिंगोली जिल्ह्यांतील ब–याच भागात रविवारी रात्री, सोमवारी पहाटे आणि दुपारच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, द्राक्ष फळबागांसह रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. वादळी वा–यासह पाऊस झाल्याने अनेक ठिकाणी ज्वारी, गहू, हरभरा, भाजीपाला आडवा झाला. त्यामुळे पिकांची हानी झाली आहे. यंदा अतिवृष्टीमुळे खरीप पिके हातातून गेली.

# विशिष्ट सण उत्सवासाठी ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास सवलत

सांगली : विशिष्ट सण उत्सवासाठी ध्वनीची विहीत मर्यादा राखून कार्यक्रमासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास सवलत देण्याकामी राज्य शासनाने संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाच्या दिनांक २२ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारानुसार जिल्हादंडाधिकारी अशोक काकडे यांनी पुढीलप्रमाणे नमूद सणांसाठी ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सवलत दिली असल्याचे आदेश जारी केले आहेत.

पुढील सण / उत्सवासाठी ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्यास सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सवलत दिली आहे. छ. श्री. शिवाजी महाराज जयंती (शासकीय) – ०१ दिवस दि. १९ फेब्रुवारी २०२६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती – ०१ दिवस दि. १४ एप्रिल २०२६, ०१ मे महाराष्ट्र दिन – ०१ दिवस दि. ०१ मे २०२६, ईद–ए–मिलाद – ०१ दिवस दि. २६ ऑगस्ट २०२६, गणपती उत्सव – ४ दिवस (पाचवा दिवस १८ सप्टेंबर २०२६, सहावा दिवस १९ सप्टेंबर २०२६, सातवा दिवस २० सप्टेंबर २०२६, अनंत चर्तुथी २५ सप्टेंबर २०२६), नवरात्र उत्सव – २ दिवस (दुर्गाष्टमी १९ ऑक्टोबर २०२६ व खंडेनवमी, दसरा २० ऑक्टोबर २०२६), दिपावली – ०१ दिवस (लक्ष्मीपूजन) दि. ८ नोव्हेंबर २०२६, ख्रिसमस, नाताळ – ०१ दिवस दि. २५ डिसेंबर २०२६, ३१ डिसेंबर – ०१ दिवस दि. ३१ डिसेंबर २०२६, तसेच उर्वरित दोन दिवस जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार सूट देण्यात येईल.

ही सवलत घोषीत शांतता क्षेत्रासाठी लागू असणार नाही. घोषीत शांतता क्षेत्रामध्ये ध्वनी प्रदुषणांची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका हद्दीमध्ये आयुक्त सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका, उप प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली व पोलीस अधीक्षक सांगली आणि ग्रामिण व शहरी भागामध्ये उप प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ सांगली व पोलीस अधीक्षक सांगली यांना प्राधिकृत केले असल्याचे आदेशात म्हटले आहे.

# राजधानीत संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली : समाजप्रबोधनकार, स्वच्छता अभियानाचे प्रणेते व कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणारे संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी कोपर्निकस मार्ग स्थित जुने महाराष्ट्र सदन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.



या प्रसंगी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, उपअभियंता किरण चौधरी, आशुतोष द्विवेदी, सहाकय लेखाधिकारी निलेश केदारे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह महाराष्ट्र सदन व परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी व्यवस्थापक महाराष्ट्र सदन प्रमोद कोलपते यांनी संत गाडगेबाबा महाराज यांच्या समाजप्रबोधन, स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षण प्रसाराच्या कार्याचा परिचय उपस्थितांना करून दिला.

# निबंध व घोषवाक्य स्पर्धेला उरले केवळ २ दिवस

कोल्हापूर : शीख धर्माचे नववे धर्मगुरू श्री. गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त विभागीय माहिती कार्यालय कोल्हापूर अंतर्गत कार्यरत असणाऱ्या जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर, सांगली व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक व सर्वसामान्य नागरिकांचा या कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग असावा, या उद्देशाने इयत्ता ८ ते १२ वी या वर्गातील विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी (खुला गट) अशा दोन गटात निबंध व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी २५ फेब्रुवारीपर्यंत आपल्या प्रवेशिका पाठवावयाच्या आहेत. या स्पर्धे साठी दोनच दिवस शिल्लक राहिले आहेत. विजेत्या स्पर्धकाला प्रमाणपत्र तसेच रोख आकर्षक बक्षीस दिले जाणार आहे.

श्री गुरु तेग बहादूर यांनी देशासाठी प्राण दिले. धर्मांतर सक्तीला शरण न जाता त्यांनी स्वतःचे बलिदान दिले. त्यांच्या शौर्याचे, बलिदानाचे व देशाबद्दलचे मानवतावादी कार्य लक्षात घेऊन तसेच त्यांच्या पराक्रमाची व्यापक माहिती इतर समाजाला व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्यातर्फे अनेक विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून विभागीय माहिती कार्यालयातर्फे, श्री गुरु तेग बहादूर – यांचे जीवन कार्य या विषयावर सुमारे ५०० ते ६०० शब्दात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच गुरु तेग बहादूर यांच्या जीवन कार्याच्या अनुषंगाने आकर्षक घोषवाक्य स्पर्धेचेही विविध गटात आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धकांनी आपला निबंध तसेच घोषवाक्य आपल्या नाव पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांकासह hinddichadarkolhapurgmail. com या ई–मेल वर २५ फेब्रुवारीपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. याबाबत काही अडचण आल्यास ०२३१–२६६२६०० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तरी इच्छूकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घ्यावा, असे आवाहन विभागीय माहिती कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. ✲ संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# 'हिंद दी चादर' शहीदी समागम वर्षानिमित्त कणकवलीत प्रेरणादायी उपक्रम

सिंधुदुर्गनगरी : श्री गुरु तेग बहादूर यांनी तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवत धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या या अद्वितीय बलिदानामुळे भारताच्या सांस्कृतिक व अध्यात्मिक अस्मितेचे रक्षण झाले. शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त शासन विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा गौरवशाली इतिहास जनतेपर्यंत पोहोचवत आहे. आजच्या समूहगानातून आपण गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करत असून या उपक्रमातून नवप्रेरणा मिळत असल्याचे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या.

'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त हा समूहगान उपक्रम कणकवली येथील विद्यामंदिर माध्यमिक प्रशाला येथे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, धर्मनिरपेक्षता आणि मानवतेच्या मूल्यांची जपणूक करण्याची प्रेरणा निर्माण झाली. या प्रसंगी तहसिलदार दिक्षांत देशपांडे, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, शिक्षणाधिकारी कविता शिंपी, मुख्याधिकारी गौरी पाटील, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची माहिती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते, असे मत व्यक्त केले.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी श्रीमती धोडमिसे म्हणाल्या की, 'हिंद दी चादर' म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर हे शीख धर्मातील नववे गुरु होते. त्यांच्या जीवनकार्याने धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि त्याग यांचे सर्वोच्च उदाहरण घालून दिले. प्रत्येकाला आपल्या श्रद्धेनुसार धर्म आचरण करण्याचा अधिकार आहे, ही त्यांची ठाम भूमिका होती. स्वतःच्या स्वार्थापेक्षा समाजहित मोठे मानावे. गरजूंना मदत करणे, दुःखींचे दुःख दूर करणे ही खरी ईश्वरभक्ती आहे. जात, पंथ, भाषा या पलीकडे सर्व मानव एकसमान आहेत. परस्परांप्रती आदर, करुणा आणि सहिष्णुता राखणे आवश्यक आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा. गुरु तेग बहादूर यांच्या शिकवणीमधून आपल्याला धैर्य, सहिष्णुता आणि मानवतेचा मार्ग मिळतो. त्यांचे जीवन हे धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठीच्या बलिदानाचे तेजस्वी प्रतीक आहे असेही त्या म्हणाल्या.

जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सामूहिकरित्या प्रेरणादायी गीत सादर केले. सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित सादर केलेले गीत समूहगानातून गायले गेले. या गीताच्या माध्यमातून गुरुंच्या त्याग, शौर्य, धर्मस्वातंत्र्य व मानवतेच्या मूल्यांची जाणीव उपस्थितांना करून देण्यात आली.



# छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवरती ४०० मीटरचा सिंथेटिक ट्रॅक करावा-अशोकराव थोरात भाऊ



कराड - सातारा जिल्हा व कराड तालुका थलेटिक्स असोसिएशन यांच्या वतीने व मळाई ग्रुप मलकापूर यांच्या सौजन्याने सातारा जिल्ह्यातील थलेटिक्स मधील प्रमुख अडचणी व पुढील नियोजन या अनुषंगाने रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मलकापूर येथे स्टार इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात विविध मान्यवर व क्रीडा प्रशिक्षक यांचे उपस्थितीत चर्चासत्राच्या आयोजन करण्यात आले होते यावेळी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

यावेळी विविध पदाधिकाऱ्यांनी एकमताने ठराव केले त्यात प्रामुख्याने कराड व सातारा येथील स्टेडियम वरती खेळाडूंच्या करता अद्यावत सिंथेटिक ४०० मीटरचा ट्रॅक तातडीने तयार व्हावा याकरिता संघटनेच्या वतीने शिष्टमंडळ तयार करून त्या संबंधित यंत्रणा य यांच्याशी बैठक करून ही मागणी लावून धरावी व पूर्ण व्हावी याकरिता प्रयत्न करणे असा ठराव करण्यात आला. त्याचबरोबर सातारा जिल्हा क्रीडा फेडरेशन पुनर्जीवित करावी व चालना द्यावी त्याचबरोबर सर्व जिल्ह्यातील नगरपालिका यांनी क्रीडा विकासासाठी त्यांना असलेल्या बजेटच्या ५% शासन निर्णयानुसार बजेट हे क्रीडा विकासासाठी वापरावे याबाबत मा. जिल्हाधिकारी महोदय यांना पत्रव्यवहार करण्याचे ठरले तसेच संबंधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुद्धा त्याची प्रत देण्याचे ठरले तसेच सातारा जिल्हा थलेटिक्स असोसिएशन वतीने दरवर्षी खेळाडूंचा सत्कार समारंभ कार्यक्रम फेब्रुवारीमध्ये घेण्यात यावा याबाबत ही ठराव करण्यात आला. यावेळी सातारा जिल्हा थलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष पांडुरंग शिंदे, सामना समिती अध्यक्ष ड मा.भरत पाटील,संस्थापक श्रीराम कदम, भारतीय थलेटिक्स कोच सुभाष पवार,आंतरराष्ट्रीय कोच बळवंत बाबर,श्री दिलीप चिंचकर उपमहाराष्ट्र केसरी चंद्रकांत सूळ, त्याचबरोबर संघटक व राष्ट्रीय खेळाडू संजय वाटेगावकर, मा.राजगुरू कोचळे,,राष्ट्रीय खेळाडू मा. नरेंद्र लिबे,माजी खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक मा. पवन पाटील,राष्ट्रीय प्रशिक्षक मा.अतुल पाटील, राष्ट्रीय खेळाडू मा. शशिकांत पाटील मा. महेंद्र भोसले मा. प्रा.दिपक डांगे पाटील,आदर्श क्रीडा संघटनेचे मा. जगन्नाथ कराळे मा. जयवंत पाटील व योगेश खराडे इतर सदस्य क्रीडा शिक्षक, राष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते.

या बैठकीमध्ये सुरुवातीला सातारा जिल्हा संघटनेची आतापर्यंत थोडक्यात माहिती श्री संजय वाटेगावकर यांनी सर्वांना दिली यामध्ये सातारा जिल्हा संघटनेचा सन २०२५-२६ वार्षिक क्रीडा अहवालाचे वाचन मा.राजगुरू कोचळे यांनी केले सविस्तर चर्चा व निर्णय होऊन संभा संपन्न झाली. याचवेळी चर्चासत्रात श्री.नरेंद्र लिबे,श्री. दिलीप चिंचकर श्री.अतुल पाटील,श्री महेंद्र भोसले, श्री.दत्तात्रय पाटील,श्री. संजय राठोड तसेच सर्व संघटनांच्या पदाधिकारी यांनी चर्चासत्रात भाग घेऊन कराड येथील क्रीडांगण, खेळाडूंचा सराव यामध्ये येणाऱ्या अडचणी यावर आपले स्पष्ट मत मांडले.

# विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कायद्याचे ज्ञान आवश्यक-संदिप घुगे

## श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचा पारितोषिक वितरण समारंभ




ईश्वरपूर(प्रतिनिधी): विद्यार्थी जीवनात शिक्षणाबरोबरच कायदा आधार आणि पालन करणे, त्याबाबतचे ज्ञान असणे हे महत्वाचे आहे. वाळवा आणि शिराळा तालुक्यात स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून अनेक अधिकारी घडले आहेत. त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून करिअर करावे, असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक संदीप घुगे यांनी केले. ते श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेच्या पारितोषिक वितरण समारंभ अंतर्गत वनश्री महोत्सव २०२६ या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सम्राटबाबा महाडिक, पोलिस उपाधिक्षक अरूण पाटील, कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी, प्रा. विनोद कापसे, प्रा.सी.बी.पाटील , प्रा. समीर नदाफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

घुगे म्हणाले, मोबाईल व तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला पाहिजे. चुकीच्या वापरामुळे कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. अलिकडच्या काळात ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार समोर येत आहेत. तसेच मोबाईलच्या गैरवापरामुळे अडचणी निर्माण होवू शकतात. यामुळे आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. आई वडीलांचा सन्मान ठेवा. गुरूजनांचा आदर आणि महान व्यक्तींच्या चरित्रांचे वाचन वाढवा, यशाचा मार्ग आपोआप सापडेल. कायदेविषयक आम्ही तत्पर आहोत.

उपाध्यक्ष महाडिक म्हणाले, स्व.वनश्री नानासाहेब महाडिक यांनी या संस्थेची स्थापना केली. सर्वसामान्यांच्या कुटूंबातील मुला - मुलींना उच्चशिक्षण मिळावे हा त्या पाठिमागचा उद्देश होता. ही संस्था केवळ शैक्षणिक प्रगती पुरती मर्यादीत नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास ठेवून कार्य करते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा स्पर्धा परिक्षेकडे ओढा वाढला आहे. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास उच्च पदावर पोहचू शकतात, ते दिसून येते. शासकीय तसेच सहकारात नोक-या कमी असल्या तरी कौशल्याला वाव देणा-या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांनी करिअर घडवावे. नव्याने फिजोथेरपी कॉलेज सुरू केले आहे. लवकरच जी.एन.एम. आणि नर्सिंगच्या शाखा सुरू होणार आहेत.

प्रा. महेश जोशी म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परिपुर्ण शिक्षण देणारी ही संस्था आहे. अभियांत्रिकीच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थी परदेशात आणि देशात विविध कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. आय.टी.आय.कॉलेजची शंभर टक्के प्लेसमेंट पुर्ण केली जाते. १० युनिटच्या माध्यमातून शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. कला, क्रीडा व सांस्कृतिक या क्षेत्रात संकुलाचा नावलौकीक सर्वदूर पसरला आहे.

यानिमीत्ताने विविध शाखा, क्रीडा स्पर्धा तसेच आदर्श शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना प्रमुख मान्यवरांच्याहस्ते गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक राहुल चिटणीस, मॅनेजमेंट कॉलेज चे डायरेक्टर डॉ. संतोष वाडकर दत्तात्रय गुरव,प्रा. मिलिंद पाटील, महेश जांभळे,पारिजा शेख,योगेश पाटील,विकास पाटील, किशोर शिंदे, चंद्रकांत गावडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# पाडळीवाडीचे सुपुत्र अशोक पाटील यांचा मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते नागरी सत्कार



शिराळा : नवी मुंबई महानगरपालिकेवर सलग चार वेळा नगरसेवक म्हणून निवडून येऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे पाडळीवाडी (ता. शिराळा) येथील सुपुत्र अशोक पाटील यांचा त्यांच्या जन्मगावी उत्साहात नागरी सत्कार करण्यात आला. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष व माजी आमदार मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन हा गौरव करण्यात आला.

अशोक पाटील यांनी नवी मुंबईसारख्या शहरात सलग चार वेळा विजय मिळवून पाडळीवाडीसह शिराळा तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल आणि त्यांनी केलेल्या लोकसेवेबद्दल ग्रामस्थांच्या वतीने या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख उपस्थिती या सोहळ्याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते, त्यामध्ये: बाळासाहेब पाटील (संचालक) सुभाष पाटील (संचालक) अमोल पाटील (संचालक) संगीताताई पाटील (माजी नगरसेविका) आतिश पाटील, राजेंद्र जोशी, नामदेव कुंभार, यावेळी बोलताना मानसिंगराव नाईक यांनी अशोक पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. शहरात राहूनही आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवणे आणि सलग चार वेळा जनमताचा कौल मिळवणे ही साधी गोष्ट नाही, असे गौरवउद्गार त्यांनी काढले. या कार्यक्रमास पाडळीवाडी येथील ग्रामस्थ आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिरास भरघोस प्रतिसाद

पुणे : रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट यांच्या पुढाकाराने व अखिल बाजीराव रोड रामनवमी उत्सव समिती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२ फेब्रुवारी २०२६) आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हे शिबिर नुमवी शाळेसमोर, बाजीराव रोड, लोखंडे तालीम चौक येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत पार पडले. शिबिराचा सुमारे ११०० ते १२०० नागरिकांनी लाभ घेतला. यामध्ये रिक्षाचालक, वाहनचालक, पायी प्रवास करणारे नागरिक, महिला व युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.




हे शिबिर चंद्रकांत पाटील (मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य तथा कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे आमदार) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समर्थ युवा फाउंडेशन यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तातील साखर, रक्तगट, रक्तदाब, कोलेस्टेरॉल तसेच रक्तातील घटकांची तपासणी करण्यात आली. दंत तपासणी, कीड काढणे, सिमेंट भरणे, स्केलिंग व पॉलिशिंग या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

तसेच ४० वर्षांवरील नागरिकांसाठी मोतीबिंदू व काचबिंदू तपासणी, महिलांसाठी ४० ते ६० वयोगटातील स्तन कर्करोग तपासणी (मॅमोग्राफी) सुविधा देण्यात आली. महिलां व पुरुषांसाठी जवळच्या दृष्टीसाठी मोफत चष्म्यांचे वाटपही करण्यात आले. सुमारे १३,५०० रुपयांच्या आरोग्य तपासण्या पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दिनेश डोंगरे, ओंकार बगाडे, अमित सातव, साक्षी मुंढे, धनश्री पांगारे, किर्ती वर्मा, सोहन बंडीवडार, मानस लबडे, गौरव कुंभार, ओमकार नवले, आयुष लांडगे, गोविंद भोसले, सुमित कुंभार, प्रथम भालेराव, साई घोणे, अमोल सोयाम, अमर (तात्या) भालेराव, वैभव फल्ले, विश्वनाथ गायकवाड, मंगेश थोरात, सुजल साळेकर आदींनी परिश्रम घेतले.

# पाचगणी पर्यावरण संवर्धनाच्या पुरस्काराच्या कार्यक्रमाला ठेकेदाराचाही समावेश

पाचगणी (अजित जगताप): महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण असलेल्या पाचगणी गिरीश स्थान नगर परिषदेने पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्याचे मूल्यमापन करून माझी वसुंधरा ४.० व ५.० अभियानात राज्यात उत्कृष्ट काम करून प्रथम क्रमांक पटकावला. ही गौरवशाली बाब असली तरी पुरस्काराच्या कार्यक्रमाला एका ठेकेदाराचाही समावेश झाल्याने या पुरस्काराचे मूल्यमापन कशा पद्धतीने झाले? याची दबक्या आवाजात चर्चा सुरू होऊ लागलेली आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये सातारा , कराड, महाबळेश्वर मान्याची वाडी, पाटण तसेच इतर अनेक नगरपालिकांना पुरस्कार मिळाले आहेत. राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पर्यावरण मंत्री पंकज मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि पुरस्कार प्राप्त नगरपालिकेचे नगराध्यक्ष ,उपनगराध्यक्ष, नगरसेवक व मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये शनिवार दिनांक२१ फेब्रुवारी मुंबई येथे सन्मान करण्यात आला. परंतु पाचगणी नगरपंचायत पुरस्कार स्वीकारताना एका ठेकेदाराची




उपस्थिती लक्षणीय ठरली आहे. याबाबत पाचगणी मध्ये मोठ्या प्रमाणात ठेकेदारीचा शिरकाव झाल्याचेच बोलले जात आहे. महाराष्ट्र राज्यात विशेषता ग्रामीण भागात पर्यावरण, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या निकषांवर आधारित राज्यस्तरीय माझी वसुंधरा अभियान सुरू केले आहे. त्यामुळे या पुरस्काराचा सन्मान हा नगरपालिकेच्या सर्व विभागातील एकत्रित कामगिरीचा मानला जातो. मात्र, पाचगणी नगरपालिका मध्ये कार्यरत असणाऱ्या ठेकेदाराला अधिकृत प्रतिनिधी म्हणून कोणत्या निकषावर सहभागी केले आहे ?याचा खुलासा व्हावा अशी मागणी पुढे आली आहे.

सातारा जिल्ह्यात दीड हजार ठेकेदार हे व्यावसायिक रित्या फायदेशीर कामे घेऊन काम करत असतात आणि राजकीय दृष्ट्या सत्तेच्या सोबत असलेल्या लोकप्रतिनिधी सोबत कार्यकर्ता म्हणूनही काम करतात. त्यामुळे राज्य शासनाच्या कोणत्याही पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचकावर जाणे किंवा ठेकेदारांचा सहभाग हा आक्षेपार्य आहे . पुरस्काराचा निकष ठेवताना वर्षभर केलेल्या कामाचे मूल्यमापन केले जाते. मग तीन महिन्याच्या कामकाजाचा आढावा घेत असताना पुरस्कारासाठी नूतन नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांना बोलवण्यात आले आहे. वास्तविक पाहता गेले तीन वर्ष स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या नाहीत. तरीसुद्धा पर्यावरण संवर्धन व इतर आवश्यक माझी वसुंधरा अभियान सुरू होते. याचाही गौरव होणे आवश्यक असल्याचे नमूद करणे गरजेचे होते.

सध्या सातारा जिल्ह्यामध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ठेकेदारी बाबत जाहीररीत्या टीका टीपणी करण्यात आली. थंड हवेचे ठिकाण असलेल्या पाचगणी मध्ये तर थेट ठेकेदारच पुरस्कारासाठी मंचकावर उपस्थित होते. वास्तविक लोकप्रतिनिधींच्या नैतिक अधिकारावरही आता गदा आणली गेली आहे. असा सूर उमटत आहे. याबाबत आता पाचगणी करांनी न्यायालयात धाव घ्यावी का ?असे प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# वनविभागाची घटनास्थळी धाव



उंब्रज(प्रतिनिधी): कळंत्रेवाडी,ता.कराड हद्दीमध्ये वाकडोबा नावाच्या शेतशिवारातील गव्हाच्या शेतात बिबट्याची दोन पिल्ले नागरिकांना आढळून आली होती.त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान, याबाबतचे सविस्तर वृत्त दैनिक प्रीतिसंगमने प्रसिद्ध करताच वन विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. तसेच उपस्थित शेतकऱ्यांना येत्या काळात बिबट- मानव संघर्ष टाळण्यासाठी कोणकोणत्या प्रतिबंधात्मक उपाय योजना, दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले. तसेच बिबट्यापासून आपल्या पाळीव पशुधनाचे संरक्षण कसे करायचे? याची देखील माहिती देण्यात आली. यावेळी वन विभागाचे सचिन खंडागळे,शंभूराज माने, शिवाजीनगरचे सामाजिक कार्यकर्ते सचिन पवार तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

**परिसराची केली पाहणी**

# लोकसंत गाडगेबाबा म्हणजे कार्याचे आणि विचारांचे उर्जास्तोत्र-प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे




कराड : लोकसंत गाडगेबाबा यांच्या १५० वी जयंती साजरी करत असताना या संतांनी समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. त्यांनी केलेल्या कार्यामधून नवीन पिढीला आपण काय आदर्श देणार आहोत की नाही ? त्यांनी निर्माण केलेल्या कार्यामधून नवीन पिढी समोर आदर्श निर्माण करणे, त्यांच्या मुल्यांची जोपासणे करणे, ती रुजिवणे वाढविणे. या महाविद्यालयाच्या भूमीला गाडगेबाबा आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पाय लागले आहेत. त्यामुळे ही भूमी पावन झाली आहे. ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून आपल्या कामाची सुरुवात गाडगेबाबांनी केली. कृती आणि युक्ती यांची सांगड घालून या महाविद्यालयाने प्रश्नमंजुषा, पोस्टर प्रदर्शन, घोषवाक्य, ऑनलाईन प्रश्नमंजुषा, म्हणी आणि स्वच्छता अभियान इ. उपक्रम राबवून महाविद्यालयीन परिसर स्वच्छता महाविद्यालयातील सेवकांनी मिळून केली. म्हणजे रयत शिक्षण संस्थेमध्ये केवळ अध्ययन, अध्यापन, केले जात नसून संस्काराचे धडे देखील दिले जातात म्हणून गाडगेबाबा यांची जयंती म्हणजे कार्याचे आणि विचारांचे एक प्रचंड मोठे ऊर्जास्तोत्र आहेत असे उद्गार रयत शिक्षण संस्थेचे, सहसचिव मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड मध्ये लोकसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. अँड. रवींद्र पवार हे होते. मा. अँड. सदानंद चिंगळे जनरल बॉडी सदस्य, मा. किसनराव पाटील जनरल बॉडी सदस्य, मा. अतुल कदम जनरल बॉडी सदस्य, उपप्राचार्य प्रा. डॉ. रमेश पोळ, प्रा. डॉ. यु.बी. मोरे, प्रा. माधुरी कांबळे, संस्थेचे अजिव सदस्य, प्रा.डॉ.ए. के. पाटील, नँक समन्वयक प्रा. डॉ. गिरीश कल्याणशेट्टी, प्रा. पवार सर, प्रा. राठोड सर, महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजसेवा केली. त्यामध्ये धार्मिक विचारांच्या पेक्षा सामाजिक प्रश्नांना अधिक प्राधान्य दिले. कीर्तनामधून प्रत्यक्ष प्रश्न विचारून त्यांची उत्तरे घेत असत. भक्ती, सेवा, श्रद्धा व विवेक व धर्म यामध्ये गल्लत केली नाही. जागृत समाजासाठी देवाच्या सेवेपेक्षा माणसाची सेवा केली. समाजाला अज्ञान, अंधश्रद्धा, जातिवाद, सावकारी पाशातून बाहेर काढले. शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती नाही म्हणून शाळा आणि वसतिगृह धर्मशाळा काढल्या. चांगले व वाईट याची जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची महती कीर्तनातून सांगितली. क्षमता धीष्टीत समाज कसा उभा राहील यासाठी प्रयत्न केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना गाडगेबाबा म्हणतात कर्मवीर हा ज्ञान सूर्य आहे, श्रमाची पुजा करणारा आहे. त्यांनी बहुजनांसाठी शाळा काढल्या मुले शिकवली माझ्या कातडीचे जोडे करून जरी त्यांच्या पायात घातले तरी ते ऋण फिटणार नाही. संस्थेची अनुदान बंद झाले असताना तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खैरे यांच्याकडे कर्मवीर अण्णांच्या कार्याची महती सांगितली मध्यस्ती केली व ग्रँड सुरू केली अशा महामानवाचा मृत्यू २० डिसेंबर १९५६ रोजी झाला. शरीराने जरी ते गेले असले तरी कार्याने व विचाराने आजही जिवंत आहेत.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, आपण ज्या मातीत काम करतो त्या मातीत एक प्रचंड ऊर्जा स्तोत्र आहे. गाडगेबाबा हे वैज्ञानिक संत होते. त्यांनी स्वच्छता हा मंत्र दिला त्यांनी केवळ शरीराची स्वच्छता केली नाही तर शरीराची, मनाची, मानवतेची, समाजाची स्वच्छता केली ही मूल्ये त्यांनी जोपासली. या मूल्यांमध्ये आपण वाढ केली पाहिजे ही मूल्ये जोपासली पाहिजेत त्यांच्या कार्यामधून आणि विचारांमधून आपण जयंती साजरी करूया हीच खरी जयंती आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत समारंभ समितीचे प्रमुख प्रा. सुहास गोडसे यांनी केले. तर सर्वांचे आभार प्रा. डॉ. सुनिल पाटील यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालय सर्व विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकपणा टाळावा-संदीप सूर्यवंशीसर



पाटण - विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षा, टेन्शनमुक्त परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाचे योग्य नियोजन करावे व पालकांनी परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची घ्यावयाची काळजी घेवुन मुलाना परीक्षेसाठी भयमुक्त करावे असे आव्हान प्राचार्य विनायक लटके सर यानी केले.

उरुल (ता.पाटण )येथील जगदंबा हायस्कूल उरुल येथे एस.एस.सी विद्यार्थी शुभचिंतन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात श्री लटके सर बोलत होते अध्यक्ष ठक्कर बाप्पा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गांधी टेकडीचे प्राचार्य विनायक लटके सर प्रमुख पाहुणे संदीप सूर्यवंशीसर मुख्याध्यापक माध्यमिक निवासी आश्रम शाळा घोगाव संस्थेचे अध्यक्ष अनिलराव निकम उपाध्यक्ष लालासो नलवडे,सेक्रेटरी रमेश दाभाडे,सचिव संजय साळुंखे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री संदीप सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा अतिरेक कसा टाळावा, अभ्यासाचे नेटके नियोजन कसे करावे, परीक्षा कालावधीत आहाराचे नियोजन कसे करावे, बोर्ड परीक्षेचा राजमार्ग या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी संचालक संभाजीराव देशमुखसर व मुख्याध्यापक श्री राजेंद्र माने सर यांनी श्री तानाजी निकम, माजी सेक्रेटरी श्री निलेश फडतरे,सदस्य श्री जयंत गायकवाड,अमिर मुलाणी बजरंग माने सुभाष देसाई आदी पदाधिकारी सह उरुल, ठोमसे, बोडकेवाडी येथील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते प्रारंभी इयत्ता ५ वी ते दहावीत उज्वल यश संपादन केलेल्या विध्यार्थ्याना रोख पारितोषिक देवुन सन्मानित करणेत आले .

प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री राजेंद्र माने सर यांनी केले तर वार्षिक पारितोषिक वाचन सरला घाडगे मॅडम यानी केले सूत्रसंचालन श्री सोपान लोहार सर व सौ. सविता पवार मॅडम यांनी केले आभार श्री रमेश पवार सर यांनी मानले.

# श्री घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग दर्जा प्रदान

सातारा-राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या पाठपुराव्यातून कास पठार परिसरातील घाटवण ता. सातारा येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. याबद्दल घाटाईदेवी देवस्थान ट्रस्ट, परिसरातील ग्रामस्थ आणि भाविकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

घाटवण येथील घाटाईदेवीच्या यात्रेला दरवर्षी हजारो भक्त- भाविक येत असतात. यापूर्वी 'क' वर्ग असल्याने या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मर्यादा येत होत्या. या तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळावा अशी मागणी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे यांच्याकडे केली होती. घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळावा यासाठी ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने राज्याच्या ग्रामविकास विभागाने घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा प्रदान केल्याचा निर्णय जाहीर केला आहे.

**ना.शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला यश; ग्रामस्थांमधून समाधान**

घाटाईदेवी तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा मिळाल्याने या तीर्थक्षेत्र परिसरातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी, भाविकांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भरीव निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे घाटाईदेवी देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामस्थांनी ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार मानले आहेत.

# श्यामच्या आईच्या पुस्तकाच्या पारायणाचे कळंबी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवजयंतीचे औचित्य साधून केले आगळे वेगळे आयोजन



औंध(वार्ताहर): समाजात एकमेकांबद्दल आदर कुटुंबातील व्यक्तींच्या संदर्भात सन्मान वडीलधाऱ्यांच्या प्रति आदरभाव या गुणांचा सध्या ऱ्हास झालेला दिसत आहे तसेच विकृत पद्धतीने नववर्षाचे स्वागत करण्याच्या पद्धतीला फाटा देऊन संस्काराची बीजे प्राथमिक शाळेतील संस्कारक्षम वयात रोवण्याच्या दृष्टीने नववर्ष ते शिवजयंती या कालावधीत जिल्हा परिषद केंद्र शाळा कळंबी येथे साने गुरुजी लिखित श्यामची आई या पुस्तकाचे एक जानेवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत पारायण करण्यात आले .

आपले आईप्रती स्नेहभाव निर्माण व्हावा आपल्या आईचे आपल्या जीवनातील स्थान आपले जीवन सुंदर होण्यासाठी घेतलेले कष्ट आणि एकंदरीतच आपली सामाजिक बांधिलकी या बाबींवर या पारायण वाचनाच्या दरम्यान प्रकाश टाकण्यात आला . अतिशय लहान लहान प्रसंगातून आपण आपले कुटुंब आपले गाव आपले राष्ट्र याबाबत कसे संवेदनशील असले पाहिजे याची माहिती या आत्मकथनातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा एक स्तुत्य उपक्रम केंद्र शाळा कळंबी ने आयोजित केला होता.

या उपक्रमास खटाव पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी अरुण पाटील, केंद्रप्रमुख धनाजी पवार तसेच गावातील नागरिकांनी भेट देऊन याबाबत विद्यार्थ्यांचे कौतुक केले . श्यामची आई हे फक्त पुस्तक नसून जीवनामध्ये कशा पद्धतीने मार्गक्रमण करावे याबाबतचा एक अध्याय असल्यास मत मुख्याध्यापक धनाजी थोरवे यांनी व्यक्त केले. पारायण कालावधीत पुस्तकातील रोज माहिती वाचून त्याबाबत मुलांनी टिपणे काढून आपल्या आई-वडिलांना सांगितली

त्यामुळे पालकांनाही या उपक्रमाचे कौतुक वाटले हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक धनाजी थोरवे ,राजेंद्र खोपडे नवनाथ जाधव, कल्याणी भोसले, दीपक पावरा यांनी परिश्रम घेतले. श्यामची आई पुस्तके वाचकांना आत्मपरीक्षण कौटुंबिक मूल्यांची कदर आणि सामाजिक बांधिलकीची शिकवण देते असे मत अरुण पाटील व धनाजी पवार यांनी व्यक्त केले . पारायणाच्या सांगता समारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी या पुस्तकातील साने गुरुजींनी सांगितलेले सर्व प्रसंग आपल्या जीवनात आत्मसात करावेत आणि आपले जीवन समृद्ध करावे असे आवाहन नवनाथ जाधव यांनी केले.

# अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात सहभाग नोंदवावा : डॉ.मारुती जाधव




ईश्वरपूर : अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात सहभाग घेतला तर नेतृत्व गुण, संघ भावना आणि उज्वल यशाचा मार्ग सापडतो; असे विचार महाराष्ट्र राज्यात तंत्र शिक्षण परिषदेचे सचिव डॉ.मारुती जाधव यांनी मांडले.

उरूण-ईश्वरपूर येथील एस. डी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये वार्षिक स्पंदन कला व क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मारुती आर. जाधव, (सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई) उपस्थित होते. अध्यक्षस्थानी वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे सहसचिव ड. धैर्यशील पाटील होते.

यावेळी डॉ. जाधव सर यांची महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या सचिवपदी निवड झाल्याबद्दल तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून नुकतीच पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व्यावसायिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला व क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

अभ्यासाबरोबरच कला आणि क्रीडा क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते, असे ते म्हणाले.

संस्थेचे सहसचिव बाबा, प्राचार्य डॉ. एस. व्ही. जावरकर तसेच उपप्राचार्य अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मैदानावर क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करून स्पर्धांना औपचारिक सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# औंध जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस गायत्री देवी पंतप्रतिनिधी यांचेकडून साऊंड सिस्टिम भेट



औंध(वार्ताहर): २६ जानेवारीला सार्वजनिक ध्वजारोहण कार्यक्रमात प्राथमिक जि.प शाळेतील छोट्या विद्यार्थींनी सादर केलेले अप्रतिम कलागुण पाहून गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी भारावून गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजावून घेतल्या होत्या. त्यावेळी त्यांनी प्राथमिक शाळेस साऊंड सिस्टीम भेट देण्याचा शब्द दिला होता. नुकताच हा साऊंड सिस्टीम औंधचे माजी उपसरपंच दिपक नलवडे, गणेश देशमुख, अनिल माने, तानाजी इंगळे, कुलदीप इंगळे, गणेश यादव, शाळेतील सर्व शिक्षक, ग्रामस्थांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक सौ.जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

# ईश्वरपूरमध्ये गाडगेबाबा जयंतीनिमित्त स्मशानभूमीची स्वच्छता;चंद्रशेखर तांदळे यांचा उपक्रम

## राज्यभर स्मशानभूमी स्वच्छता व प्रबोधन अभियान सुरू







ईश्वरपूर : कर्मकांड,अंधश्रद्धा निर्मुलन,अनिष्ट चालीरिती यावर किर्तनातून सडेतोड बोलून गावेच्या गावे स्वच्छता करणाऱ्या कर्मयोगी जीवन जगलेल्या संत गाडगेबाबा यांची येथील निनाईनगर परिसरातील स्मशानभूमीत लोकराज्य विद्या फौंडेशनच्यावतीने श्रमदान करून १५० वी जयंती साजरी करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर तांदळे यांनी गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून निनाई नगरमधील स्मशानभूमीत वाढलेली झाडे झुडपे,अंत्यविधीचे पडलेले सहित्य, अर्धवट जळालेली लाकडे, पालापाचोळा,पाण्याच्या बाटल्या,केरकचरा आदी स्वच्छ करून स्मशानभूमीची संपूर्ण स्वच्छता केली. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला अभिवादन करून तांदळे यांनी स्वच्छतेला प्रारंभ केला.संत गाडगेबाबा,संत तुकडोजी महाराज,महात्मा गांधी यांच्या विचारांचा पगडा असलेल्या चंद्रशेखर तांदळे यांनी २०१७ पासून स्मशानभूमी स्वच्छता व प्रबोधन अभियानाला सुरवात केली. आतापर्यंत सहा जिल्ह्यातील २३ तालुक्यातील ४९९ स्मशानभूमी स्वच्छ केल्या असून राज्यातील एक हजार १११ स्मशानभूमी स्वच्छ करण्याचा त्यांचा संकल्प आहे. गावकुसाबाहेर असलेल्या आणि स्वच्छतेच्या बाबतीत नेहमीच दुर्लक्षित असणाऱ्या स्मशानभूमीत अंत्यविधीव्यतिरिक्त कोणीही फिरायला तयार नसतो. तेथील अस्वच्छता दूर करून स्मशानभूमी स्वच्छतेबरोबर अनिष्ट चालीरीती, प्रथा परंपरा मोडून निघाव्यात यासाठी त्यांचे काम सुरू आहे. राष्ट्रीय एकात्मता समाजात वाढावी यासाठी त्यांनी स्मशानभूमीतच महिला हळदी कुंकू समारंभ,रक्तदान शिबिर,अभंग किर्तन,कवी संमेलन, पुरस्कार वितरण, व्याख्यान आदी विविध उपक्रम राबविलेले आहेत.

**स्मशानभूमी आणि त्याठिकाणचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी झाडलोट करणाऱ्या कर्मचारी आणि नागरिकांनीही अंत्यविधीसाठी आवश्यक असणारेच साहित्य व नैवेद्य, कचराकुंड्यांची सोय, वीज, पाणी, दैनंदिन स्वच्छता,आदी काळजी घेतल्यास तिथे नक्कीच स्वच्छता राहणार आहे.**
**- चंद्रशेखर तांदळे, सामाजिक कार्यकर्ते.**